# CURRENT GLOBAL REVIEWER

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-86948

Multidisciplinary International Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL


# Relevance of Mahatma Gandhi in Today's World

**March 2020 Special Issue – 26 Vol. III**


Chief Editor

**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**

*Guide*

**Dr. B. G. Gaikwad**

Principal

Shivaji College, Hingoli (MS)

*Editor*

**Dr. Balasaheb S. Kshirsagar**

Director , Gandhi Study Center

Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*

**Dr. Dhale S.U.**

Dept. of Political Science,

Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*

**Dr. Hurgule N.R.**

Dept. of Sociology,

Shivaji College, Hingoli (MS)


PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

18. महात्मा गांधी आणि स्वच्छता : एक चिंतन अभ्यास — 48
प्रा.डॉ.भालेराव एस.एस.

19. महात्मा गांधी यांच्या विचारांचे विविध पैलू — 50
प्रा. डॉ. केशव पाटील

20. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास — 54
प्रा.डॉ. मुळे पी.एम.

21. महात्मा गांधी सत्याग्रह – अर्थ तंत्र व साधने — 56
प्रा. डॉ. संजय जे. भगत

22. म. गांधी यांच्या विचारांचे विविध पैलू व उपयोगीता — 59
डॉ.डी.डी. कोल्हेकर

23. महात्मा गांधीजींचे सत्याग्रहाचे तत्वज्ञान व प्रारंभिक कामगिरी . — 63
प्रा.डॉ. जगदिश दयासागर हेडवे

24. महात्मा गांधी आणि स्वातंत्र्य चळवळ — 66
प्रा. अनंत मोगल

25. महात्मा गांधी विचारांचे विविध पैलू — 68
प्रा.डॉ. वसंत कदम

26. महात्मा गांधी यांचे सत्य अहिंसेविषयक विचार. — 71
सहा.प्रा. आनंद गो. मनवर,

27. महात्मा गांधी आणि सर्वसामान्य जनता — 73
डॉ. विपिन राठोड

28. गांधी विचार व खादी — 76
डॉ. चंदन एम. बावलगावे

29. महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार — 78
प्रा. डॉ. तोटे दादासाहेब सर्जेराव

30. महात्मा गांधी प्रणीत स्वयंपूर्ण खेडी — 80
प्रा. अनिता प्रेमराज भोळे

31. महात्मा गांधी विचाराची पंचायतराज मधील मुल्य :एक चिंतन — 82
प्रा.डॉ.गंगाधर भोसले

32. ग्राम विकासात गांधीवादाची प्रासंगिकता — 85
डॉ.कल्पना हनुमंतराव घारगे

33. महात्मा गांधीजी यांचे ग्रामराज्य संकल्पना — 87
प्रा. लक्ष्मण मारोती पोटेकर

34. महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार — 89
प्रा. तेलंगे एन. एन.

35. "महात्मा गांधी आणि पंचायत राज" — 91
प्रा.डॉ.डी.बी.पवार

36. 'महात्मा गांधींचे भारतीय आदिवासी विषयक विचार' — 94
प्रा. डॉ. क्षीरसागर बी. एम. , प्रा.जी.एम.घुटे

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI



69

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28, Vol. 3 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# 'महात्मा गांधींचे भारतीय आदिवासी विषयक विचार'

प्रा. डॉ. क्षीरसागर बी. एस.
इतिहास विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

प्रा.बी.एम.घुटे
शां.घो. कला विज्ञान व वी.प.
वाणिज्य महाविद्यालय शिवळे,
ता.मुरबाड, जि. ठाणे.

**प्रस्तावना-**

आधुनिक भारताच्या इतिहासातील सर्वात गाजलेले पर्व म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढा व त्यामध्येही 'गांधीयुग' भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनेकांचे योगदान उल्लेखनिय आहे. यामध्ये लोकमान्य टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशहा मेहता, सरदार पटेल, पंडीत नेहरू यांचा उल्लेख करावा लागेल. याशिवाय भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, वासुदेव बळवंत फडके यांनी तर बलिदान केले, पण यांमध्ये सर्वात ठळक कार्य दिसते ते महात्मा गांधी, कारण त्यांनी १९२० ते १९४७ अशी सलग २७ वर्षे देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले आणि देशाच्या सर्वच घटकांना स्वातंत्र्यलढ्यामध्ये सामावून घेऊन स्वातंत्र्य लढ्याला व्यापक रूप दिले. म्हणूनच देश स्वतंत्र झाला. या सर्व कार्यामुळेच त्यांना त्यांचे विरोधक सुभाषचंद्र बोसही 'राष्ट्रपिता' म्हणून उल्लेख करतात. अशा या थोर व्यक्तीमत्वाने आदिवासींबद्दल विचार केला नसेल का? असे होणे शक्य नाही. त्यांनी मांडलेल्या विचारांचा सखोल अभ्यास करून उपाययोजना केल्या असत्या, तर आज भारतातील आदिवासी ज्या स्थितीत आहे त्यापेक्षा कित्येक पटीने पुढे गेलेला दिसला असता. प्रस्तुत शोधनिबंधात 'महात्मा गांधींचे भारतीय आदिवासीविषयक विचार' याबद्दल विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**महात्मा गांधींचे भारत (देश) भ्रमण-**

महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात आले आणि देशाच्या राजकारणात सक्रिय होण्याअगोदर त्यांनी भारतभ्रमण करण्याचा निर्णय घेतला. देशाच्या कानाकोपऱ्यात फिरत असताना उपासमार, दारिद्र, बेकारी, अंधश्रध्दा, व्यसनाधिनता या गोष्टी दिसल्या आणि त्यांच्या मनावर त्याचा खोलवर परिणाम झाला. त्या काळात हे सर्व प्रश्न बहुजन, वंचित, आदिवासी घटकातीलच आहेत आणि आदिवासी घटकाचा विचार केल्यास ते प्रश्न अजुनही सुटलेले नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदेशीर तरतुद करून ठेवली, पण अज्ञानामुळे त्याचा फायदा घेता आला नाही. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आज २१व्या शतकात बऱ्याच योजना व नोकऱ्या बिगर आदिवासी बळकावित आहेत. आदिवासींना प्रभावी नेतृत्व न मिळाल्याने ही अवस्था झाली आहे. मात्र महात्मा गांधीजींनी ग्रामीण किंवा खेड्याबद्दलचे विचार हे आदिवासींना समोर ठेवूनच केले होते.

**महात्मा गांधीजींचे भारतीय आदिवासींबद्दलचे विचार-**

**दारूबंदी-**

गांधीजी मुळातच व्यसनाच्या विरोधात होते. दारूला तर त्यांचा कडाडून विरोध होता. दारूमुळे कौटुंबिक कलह निर्माण होतो, आर्थिक नुकसान होते, शरीर संपत्तीची हानी होते, सर्व प्रकारच्या सुखांचा ऱ्हास होतो. समाजात निंदानालस्ती होते. मात्र आदिवासी समाजात कोणतेही कार्य दारूशिवाय पार पाडले जात नाही. म्हणून त्यांची सामाजिक स्थिती सुधारायची असेल तर दारूबंदी केली पाहिजे, असे महात्मा गांधींनी त्या काळात ओळखले होते. त्यावेळी त्यांनी 'यंग इंडिया' मधील एका लेखात लिहिले होते की जर मला एका तासासाठी अखिल भारताचा हुकुमशहा नेमले तर मी नुकसान भरपाई न देता दारूचे सर्व गुत्ते बंद करीन.

**ग्रामोद्योग-**

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बेकारी आहे आणि या बेकारीमुळेच देशात दारिद्र्य वाढले आहे. लोकांच्या हाताला काम मिळाल्यास त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल. ग्रामीण भागातील आदिवासी उदरनिर्वाहाकरिता निसर्गावर आधारित शेती करतात. याव्यतीरिक्त त्यांना उत्पनाचे साधनच नाही. त्यामुळे या भागात नियोजन करून मार्गदर्शन करावे व हस्तउद्योगाला चालना द्यावी. तसेच उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून द्यावी, हे महात्मा गांधींच्या विचाराचे मर्म होते.

**नई तालिम-**

गांधीजींना वर्गातील बंदिस्त पोपटपंची स्वरूपाचा अभ्यासक्रम मान्य नव्हता. त्यांच्या मते शिक्षणातून व्यक्तिचा नैतिक, मानसिक, बौध्दिक व शारिरीक विकास होतो आणि तीच सर्वोत्तम शिक्षणप्रणाली होय. अशा शिक्षणातून श्रमाला प्रतिष्ठा



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

70

मिळेल. आज आपण बघतो देशातील आदिवासी श्रमप्रधान आहे. आपण ज्याचा विचार सुध्दा करू शकणार नाही एवढे काबाडकष्ट तो करतो. पण त्याला प्रतिष्ठा नाही. महात्मा गांधींची शिक्षणप्रणाली अस्तित्वात आली असती तर कदाचित परिस्थिती वेगळी असती.

**प्रौढ शिक्षण-**

देशाच्या ग्रामीण/आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात निरक्षरता आहे आणि म्हणूनच सावकार जमिनदार त्याचा गैरफायदा घेतात. आदिवासी जनतेचे शोषण थांबवायचे असेल तर प्रौढ शिक्षणाशिवाय पर्याय नाही. प्रौढ शिक्षणातून त्यांच्या जाणिवा विकसित होतील. सभोवतालच्या जगाकडे खुल्या नजरेन बघण्याची दृष्टी त्यांना येईल. प्रौढ शिक्षणाने त्यांना शिक्षणाचे महत्व लक्षात येईल व ते आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी शिक्षणाचा आग्रह धरतील.

**आरोग्य सुधारणा-**

निरोगी जिवनातुनच यशाची सिध्दी प्राप्त करता येते. आदिवासी भागात उपासमार, दारिद्र्य, घानीचे साम्राज्य यामुळे अनेक रोगांना आमंत्रणच मिळते. त्यातच ते अंधश्रध्दाळू असल्याने वेळेवर योग्य उपचार घेत नाही किंवा मिळतच नाही. त्यामुळे तेथील आयुर्मान कमी झाले आहे. निरोगी आरोग्य साध्य करण्यासाठी आहार-विहार, व्यायाम, निसर्गोपचार इत्यादी उपाययोजना सांगितल्या आहेत. तसेच ग्रामस्वच्छतेलाही महत्व दिले आहे.

**आर्थिक समानता-**

महात्मा गांधींना आर्थिक, सामाजिक, धार्मिक अशा कोणत्याच क्षेत्रात विषमता मान्य नव्हती. सर्वोदय म्हणजे सर्वांचा विकास असे त्यांचे ध्येय होते. हे ध्येय आर्थिक समतेशिवाय शक्य नव्हते. व्यक्तिच्या सर्वांगीण विकासासाठी समतेची गरज आहे. भारतातील आदिवासी समाज आजही लाजरा बुजरा व न्युनगंडाने ग्रासलेला आहे. कारण तो आजही समानतेच्या प्रवाहामध्ये आलेला नाही.

**मातृभाषेतून शिक्षण-**

शिक्षण समाजाच्या प्रत्येक अंगापर्यंत पोहोचण्यासाठी ते लोकभाषा मातृभाषेतून होणे गरजेचे आहे. भारतात दर बारा कोसावर भाषा बदलते. तसेच ग्रामीण आदिवासी भाषा भिन्न स्वरूपाची आहे, त्यामुळे त्या मुलांना प्रमाणभाषेत शिकण्यासाठी बराच कालावधी जातो. त्यामुळे ते अभ्यासक्रमामध्ये मागे पडतात. त्यांना शिक्षणप्रवाहात आणून विकास करायचा असेल, तर त्यांच्या मातृभाषेत शिक्षण देणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष-**

भारतातील आदिवासी भागात रस्ते, सार्वजनिक दिवाबत्तीच्या सोईचा अभाव, शौचालयाची अपुरी संख्या, सार्वजनिक आरोग्याकडे दुर्लक्ष, अपुरा व अनियमित पाणीपुरवठा इत्यादी समस्या प्रकर्षाने जाणवतात.

शिक्षणाची सोय नसल्याने अंधश्रध्दा, वाईट रूढी-परंपरा यामुळे त्यांचा मागासलेपणा कमी होण्याऐवजी वाढतच जाताना दिसतो. अर्थकारण पुर्णत: शेती आधारित असल्याने त इतर ग्रामीण लघु-कुटीरउद्योगांच्या अभावामुळे बेकारी व दारिद्र्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. गांधीजींनी ग्रामीण भागातील किंवा आदिवासी भागातील सर्वात गंभीर आजार म्हणजे दारूबाजी होय. की ज्यामुळे संपुर्ण समाजच खंगतो. त्याचबरोबर ग्रामीण भागात आरोग्याबाबत अनास्था असल्याने आयुर्मान कमी आहे.

मागे ९०-१०० वर्षापूर्वी महात्मा गांधींनी केलेले ग्रामीण / आदिवासी भागाचे निरिक्षण व त्यावर सुचविलेल्या उपाययोजना जर स्वतंत्र भारतामध्ये तंतोतंत राबविल्या असत्या तर भारतीय आदिवासींची परिस्थिती नक्कीच बदललेली दिसली असती.

**संदर्भग्रथ सुची-**

१) डॉ.व्हि.जी.कुलकर्णी, प्रा.कांत सोमवंशी, 'भारतीय राजकीय विचारवंत', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
२) डॉ. साहेबराव गाठाळ, 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
३) डॉ. दा. धो. काचोळे, 'सामाजिक विचारांचा मुलधार', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
४) डॉ. श. गो. कोलारकर, 'भारताचा इतिहास', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
५) डॉ. श्रीराम जाधव, 'गांधीजी आणि सामाजिक समता', अथर्व पब्लिकेशन, पुणे.
६) मा. अशोक जैन, 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण', शेट पब्लिकेशन पुणे.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI